# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# // प्रसिद्धपत्रक //

- **मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त यांचा आरोग्य केंद्र व शासकीय सुविधा स्थळ पाहणी दौरा**

दिनांक 31 जुलै 2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी मिरा रोड आरोग्य केंद्र, पेणकरपाडा आरोग्य केंद्र आणि काशीगाव आरोग्य केंद्र याठिकाणी प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून आरोग्य व्यवस्थापन, वैद्यकीय सुविधा, स्वच्छता व नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा आढावा घेतला. आरोग्य केंद्रातील कार्यप्रणाली, डॉक्टर व वैद्यकीय कर्मचाऱ्यांची उपस्थिती, औषधसाठा, रुग्णनोंदणी प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती घेतली.

सदर पाहणी दरम्यान मा. आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना आरोग्य केंद्रात स्वच्छता, रुग्णांसाठी बसण्याची सुविधा, स्वच्छ शौचालये, निर्जंतुकीकरण व्यवस्था याबाबत सूचना दिल्या. रुग्णसेवा ही महापालिकेची प्राथमिक जबाबदारी असून, कोणतीही तडजोड चालणार नाही, असे मा. आयुक्तांनी सांगितले. त्यानंतर मा. आयुक्तांनी मिरा रोड येथील पशुवैद्यकीय दवाखाना आणि भाईंदर पश्चिम येथील कोंडवाडा या ठिकाणांची पाहणी केली. पशुवैद्यकीय दवाखान्यात जनावरांवरील उपचार, लसीकरण मोहिमा व जनजागृती उपक्रम यावर चर्चा करण्यात आली. कोंडवाड्याच्या परिसरात स्वच्छता, सुरक्षा व्यवस्था, कचरा व्यवस्थापन याचा आढावा घेऊन सुधारणा करणेबाबतच्या सूचना दिल्या. तसेच काशीगाव येथील महानगरपालिका मराठी शाळा क्रमांक 4, उर्दू शाळा क्रमांक 5 आणि महानगरपालिका उर्दू शाळा क्रमांक 34 या शाळांना मा. आयुक्तांनी भेट देऊन तेथील स्वच्छतेचा आढावा घेऊन आवश्यक त्या सूचना दिल्या.

या पाहणी दौऱ्यात अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त कविता बोरकर, शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता नितीन मुकणे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रमोद पडवळ तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. नागरिकांसाठी दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवांचा दर्जा उंचावण्यासाठी व त्यामध्ये सातत्याने सुधारणा व्हावी या उद्देशाने हा दौरा करण्यात आला असून, येणाऱ्या काळात अशा पाहणी दौऱ्यांची नियमितता ठेवण्यात येईल, असे मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांनी स्पष्ट केले.